# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेस नोट दि २२/०७/२०२२**

**अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कारवाई**

**गोदामामध्ये विक्रीसाठी साठवुण ठेवलेला २३ लाख ३५ हजार ८०० रुपये किंमतीचा गुटखा, सुगंधीत तंबाखु व पान मसालासह गुटखा वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे वाहन जप्त**

---

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारी गुटखा पानमसाला विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा या करीता मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे – १, श्री. पदमाकर घनवट व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. सतिश पवार यांनी वेळोवेळी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे दि. २१/०७/२०२२ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे – १ यांचे कार्यालयातील वाचक महीला सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा हाबळे यांना मिळालेल्या माहीतीवरुन वपोनि सतिश पवार यांचे सुचनेप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेकडील पोलीस अमंलदार तसेच महीला सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा हाबळे व त्यांचा स्टाफ असे त्रिवेणीनगर चौकात एकत्र येवुन सतिश पवार यांनी दिलेल्या सुचनांनुसार चिखली पोलीस स्टेशनचे हद्दीतील विकास हौसिंग सोसायटी, रुपीनगर, तळवडे, चिखली, पुणे येथे मकबूल शेख यांचे घरासमोर असलेल्या घरावर (गोदामावर) छापा मारुन तेथे लोकसेवकाने जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा सदर गोदामासमोरच उभ्या करण्यात आलेल्या सिल्वर रंगाच्या इर्टीका कंपनीच्या गाडी नं. एमएच १२ पीझेड ७७०१ या वाहनामध्ये गुटख्याची पोती भरीत असणाऱ्या इसम नामे **दलपत रामाजी परिहार, वय ३२ वर्षे, रा. रुम नं. ३, ज्योतीबा चाळ, तळवडे रोड, रुपीनगर, पुणे, मुळगाव खोड, ता. जि. पाली, राजस्थान** यास ताब्यात घेवुन सदर गाडीची व गोदामाची झडती घेतली असता, **१६,३५,८००/- रु. किंमतीचा प्रतिबंधित गुटखा व वाहन असा एकुण २३,३५,८००/- रु. किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.** सदर इसम दलपत परिहार हा गोदामामध्ये माल खाली करणे व डिलेवरी करण्याचे कामासाठी असुन सदरचा माल हा इसम नामे **मांगीलाल सोळंकी, रा. रुपीनगर** (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) याचा असल्याचे त्याने सांगितलेने त्या दोघांविरुध्द चिखली पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याल आला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास चिखली पोलीस स्टेशन करीत आहे.

**सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा.पोलीस उपायुक्त, गुन्हे, डॉ काकासाहेब डोळे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे – १, पदमाकर घनवट, यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा हाबळे व पोलीस अमंलदार बाळासाहेब सुर्यवंशी, प्रदिप शेलार, राजेंद्र बांबळे, दिनकर भुजबळ, संतोष दिघे, संदिप पाटील, मनोज राठोड, अजित कुटे, प्रसाद कलाटे, दादा धस, प्रसाद जंगीलवाड, अशोक गारगोटे, पांडुरंग फुंदे, आंधळे, आशा लोमटे व रणधीर माने यांनी केली आहे.**

(डॉ काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner